आयुक्त दालन
आवक क्र.: ३८५
दिनांक: ०६/०६/०८

आरोग्य विभाग
आ. क्र. ४
दि.क्र. ८/७

राज्य ग्रामीण आरोग्य अभियान–
जननी सुरक्षा योजना प्रभावीपणे राबविणे
बाबत मार्गदर्शक सूचना.

**राज्य आरोग्य सोसायटी**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**परिपत्रक क्र. राग्राअ २००८/प.क्र. २० /आरोग्य - ७ (ब)**
**दिनांक :२२ फेब्रुवारी. २००८**

**परिपत्रक :-**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राज्यात सन २००५ पासून राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा सर्व स्तरावर वेळोवेळी घेण्यात येतो. याबेळी असे निदर्शनास आले आहे की, "जननी सुरक्षा योजना" प्रभावीपणे राबविण्यात येत नाही. ही बाब विचारात घेता खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२. राज्यातील बहुतेक जिल्हयांनी जननी सुरक्षा योजनेचे उद्दिष्ट अत्यंत कमी दर्शविलेले आहे. सर्वसाधारणपणे राज्यात होणाऱ्या एकूण प्रसुतीच्या किमान २५% एवढे उद्दिष्ट या योजनासाठी असणे अपेक्षित आहे. आदिवासी व मागास जिल्हयामध्ये जननी सुरक्षा योजनेचे उद्दिष्ट ७५% ते ८०% असणे आवश्यक आहे. या पुढील सन २००८-०९ वर्षाच्या प्रकल्प अंमलबजावणी कार्यक्रमात जिल्हयांनी याप्रमाणे उद्दिष्ट ठेवण्यात यावे.

३. अभियानांतर्गत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेताना असे निदर्शनास आले आहे की, जननी सुरक्षा योजने अंतर्गत संस्थेमध्ये होणाऱ्या प्रसुतीपेक्षा घरी होणाऱ्या प्रसुतीचे प्रमाण जास्त आहे. ही बाब निश्चितच खेदजनक आहे. घरी होणाऱ्या प्रसुतीचे प्रमाण एकूण प्रसुतीपैकी जास्तीत जास्त ३०% पर्यंत असावे. संस्थेमध्ये जास्तीत जास्त प्रसुती होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

४. सन २००८-०९ या वित्तीय वर्षापासून जननी सुरक्षा योजना राबविताना घरी प्रसुत झालेल्या महिलेला रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे ) देताना ज्यांची प्रसुती ए.एन.एम. अथवा प्रशिक्षित दायीच्या उपस्थितीत झाली असल त्यांनाच हा लाभ देण्यात यावा व इतरांना या योजनेचा लाभ देण्यात रोकू नये, जेणेकरुन सुरक्षित प्रसुती होईल.

५. अभियानांतर्गत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेताना असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच जिल्हयांमध्ये Home Deliveries चे १००% उद्दिष्ट साध्य करण्यात आले असून, सर्वच्या सर्व घरी प्रसुत महिलांना लाभ दिल्याचे दाखविण्यात आलेले आहे. ही बाब थोडी विसंगत वाटते, त्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका

Health officer

Kahane
09/07/08 (Dr. Kamble)
श्रीम. सोयली सर्व आरोग्य केंद्राना तात्काळ सादर परिपत्रक पाठवावे.

आरोग्य अधिकारी इ. यांनी घरी अकस्मिक भेटी देऊन सदरहू रक्कम संबंधित महिलेस देण्यात आली आहे किंवा कसे याची खात्री करावी.

६. शहरी भागात जननी सुरक्षा योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्याचे मुख्य कारण म्हणजे त्या जिल्ह्यात असलेल्या वैद्यकिय महाविद्यालयांनी केलेला असहकार हे आहे. वैद्यकिय महाविद्यालयामध्ये सद्या काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यास/ लिपिकास या कामासाठी अतिरिक्त मोबदला (वेतनाच्या १०% ) देऊन त्याच कर्मचाऱ्यांकडून या योजनेची कामे करुन घ्यावीत. यासाठी नवीन कर्मचारी वृंद नियुक्त करण्याची आवश्यकता नसावी.

७. जननी सुरक्षा योजना ही दारिद्रय रेषेखालील समाजासाठी तसेच अनुसुचित जाती/जमाती समाजासाठी राबविण्यात येते. यावेळी अनुसुचित जाती/जमाती समाजातील महिला दारिद्रय रेषेखालील असणे आवश्यक नाही. तथापि बऱ्याच वेळी ए.एन.एम. स्तरापर्यंत ही बाब लक्षात येत नाही. अनुसुचित जाती/जमाती समाज जो दारिद्रय रेषेवरील आहे तो या योजनेपासून वंचित राहतो. तरी अनुसुचित जाती/जमाती समाजातील महिला दारिद्रय रेषेखाली असणे आवश्यक नाही. त्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा.

८. जननी सुरक्षे योजनेचा लाभ देताना दारिद्रय रेषाखालील तसेच अनुसुचित जाती/ अनुसूचित जमाती मधील गरोदर मातांकडे संबंधित प्रमाणपत्राचा आग्रह धरण्यात येतो, असे न करता घरातील इतर व्यक्तींचे उदा.पतीचे/वडीलांचे प्रमाणपत्र सुध्दा ग्राहय धरण्यात यावे. अथवा दारिद्रय रेषेखालील, अनुसुचित जाती/ अनुसूचित जमाती म्हणून जर इतर शासकीय योजनांचा लाभ घेतला असेल व त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध असतील तर या योजनेचा लाभ संबंधित महिलेला देण्यास हरकत नसावी.

९. शहरी क्षेत्रात झोपडपट्टी विभागातील महिला ए.एन.सी. साठी नोंद करण्यासाठी शासकिय रुग्णालयात येते. त्यावेळी संबंधित डॉक्टरांनी ही दारिद्रयरेषेखालील आहे किंवा कसे याबाबत स्वतः निर्णय घ्यावा. सदर महिला झोपडपट्टीची निवासी असल्यास तिला या योजनेचा लाभ देण्यात यावा.

१०. आदिवासी जिल्हयांमध्ये नवसंजीवनी योजनेंतर्गत " मातृत्व अनुदान योजना" सुध्दा राबविण्यात येते. या योजनेंतर्गत गरोदर मातेस ए.एन.सी. नोंदणी नंतर प्रत्येक तपासणीच्या वेळी रु. १००/- याप्रमाणे चार तपासण्याच्या वेळी एकूण रु.४००/- (अक्षरी रुपये चारशे फक्त) एवढी रक्कम अनुज्ञेय असते. व रु.४००/- रक्कमेची औषधे अनुज्ञेय असतात. "जननी सुरक्षा योजने" अंतर्गत लाभार्थींना लाभ देताना रु. ७००/- ग्रामीण क्षेत्राकरीता व ६०० रु. शहरी क्षेत्राकरीता एवढे अनुदान अनुज्ञेय असते. या दोन्ही योजनांचे पैसे संबंधित महिलेला मिळणे आवश्यक आहेत. तथापि असे निदर्शनास आले आहे की, आदिवासी जिल्ह्यातील गरोदर महिलांचा अशिक्षीतपणाचा फायदा घेऊन

काही प्रकरणी फक्त एकाच योजनेचा लाभ देऊन दोन्ही योजनेचा लाभ मिळाल्याबाबत हाताचा अंगठा घेऊन फसवणुक करतात. त्यामुळे रुग्णालयाच्या बाहेर सुचना फलकावर या दोन योजनांची माहिती स्पष्टपणे लिहिण्यात यावी व दोन्ही योजनेचा लाभ आदिवासी जिल्ह्यातील महिलांना अनुज्ञेय असल्याचेही नमूद करावे.

११. जननी सुरक्षा योजना राबविताना दिनांक १ मार्च २००८ पासून धनादेशाद्वारे रक्कम अदा करावी. Post Dated हे धनादेश प्राथमिक आरोग्य केंद्रामधील कर्मचाऱ्यांनी गरोदर महिलांची अपेक्षित प्रसुतीचा दिनांक विचारात घेऊन १-२ महिने अगोदरच एन.एन.एम. कडे द्यावेत, जेणेकरुन एन.एन.एम. लाभार्थींना प्रसुतीनंतर त्वरित धनादेश देऊ शकेल.

(शोमिता बिश्वास)
सह सचिव व सदस्य कार्यकारी समिती
राज्य आरोग्य सोसायटी

प्रति,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा शल्यचिकित्सक ,
सर्व आयुक्त, महानगरपालिका
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी ,
सर्व संपर्क अधिकारी,
सर्व उपसंचालक,आरोग्य सेवा मंडळ ,
सर्व सहायक संचालक, आरोग्य सेवा
सर्व अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
अपर मुख्य सचिव (आरोग्य व कु.क.) यांचे स्वीय सहायक,सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई
आयुक्त (कुटुंब कल्याण ) यांचे स्वीय सहायक,सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई
सह सचिव (श्रीमती बिश्वास ) यांचे स्वीय सहायक,सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती - आरोग्य -७ (अ)/ आरोग्य-७ ब, सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (कु.क-१)